**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ० ५१.
ईपीबीएक्स : २६५९००१-०८ / २६५९ ४००० फॅक्स : २६५९१२६४
ई-मेल : mmrda@giasbm01.vsnl.net.in वेबसाईट : http://www.mmrdamumbai.org

# अर्हता निश्चित करण्याविषयी आवाहन

## मालाड - मार्वे - मनोरीतर रस्त्यावर मनोरी खाडीवर केबल स्टेड पूलाचे संकल्पन व बांधकाम करणे.

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मालाड - मार्वे - मनोरीतर रस्त्यावर मनोरी खाडीवर केबल स्टेड पूल बांधण्याचे प्रस्तावित असून सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे २०० कोटी रुपये इतकी आहे.

२) नजीकच्या भविष्यातील वाहतुक सुविधेच्या वाढत्या मागणीच्या अनुषंगाने पश्चिम द्रुतगती महामार्ग व स्वामी विवेकानंद मार्ग या दक्षिणोत्तर साखळीमार्गावरील वाहतुक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने सदर खाडीपूल एक अतिरिक्त किनारी रस्त्याचा पर्याय ठरु शकेल. तसेच या खाडी पुलामुळे भविष्यात भाईंदर ते मनोरी क्षेत्रातील विकासासाठीदेखील फायदा होईल.

३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुलाच्या बांधकामाचा अनुभव असलेल्या कंत्राटदारांकडून सदर खाडी पूलाच्या संकल्पन व बांधणीच्या अर्हता निश्चित करण्यासाठी प्रस्ताव मागवित आहे.

४) निविदा संचात नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून कमाल दोन भागीदार असलेली संयुक्त अभिकरणे अनुज्ञेय असतील.

५) पात्रतेकरीता खालील अटी पूर्ण करणारे कंत्राटदार निविदासंच घेण्यास पात्र असतील.

अ) संयुक्त अभिकरणांच्या बाबतीत किमान एक भागीदार सा. बां. विभाग, महाराष्ट्र शासन तथा इतर राज्य शासन/केंद्र शासन / केंद्रीय सा.बां.विभाग / राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, भारत सरकार / मुंबई महानगर पालिका यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असावा.

ब) कंत्राटदाराने ३१/०३/२००९ पर्यंत संपणा-या मागील ५ वर्षापैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात किमान १६८ कोटी रुपये एवढया किंमतीची स्थापत्य कामे केलेली असावीत.

क) मागील ५ वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात कंत्राटदाराने संयुक्त अभिकरणातील प्रमुख भागीदार म्हणून १५० कोटी रुपये किंमतीचे किमान एक स्थापत्य काम यशस्वीरित्या पूर्ण केलेले असावे.

ड) कंत्राटदाराला किमान २०० मीटर लांबीच्या गाळयाच्या ( दोन पायलॉनच्या मध्य बिंदूमध्ये मोजलेला) समुद्र / नदी किंवा खाडीवरील केबल स्टेड पुलाच्या (एक्स्ट्राडोस पद्धतीचा नव्हे)बांधकामाचा अनुभव असावा.

ई) संयुक्त अभिकरणाच्या बाबतीत, दोन्ही भागीदारांनी अभिकरणाचा भागीदार म्हणून मागील पाच वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात किमान २०० मीटर लांबीचा नदीवरील किंवा खाडीवरील किमान एक पूल बांधून पूर्ण केलेला असावा.

६) कोणत्याही शेडयूल्ड / राष्ट्रीयकृत / भारतीय शाखा असलेल्या परदेशी बँकेतून मुंबई येथे देय असलेला, 'एमएमआरडी फंड' यांच्या नावाचा रु. ५०,०००/- फक्त इतक्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डरसोबत कंत्राटदारांच्या नोंदणीचे प्रमाणपत्र, आयकराचे विवरण पत्र तथा मूल्यवर्धित कराच्या नोंदणीपत्रासह मुख्य अभियंता, यांच्या नावाने अर्ज केल्यास अर्हतेचा निविदा संच मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ५ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व) येथे दि. २०/११/२००९ दि. ४/१२/२००९ दरम्यान कार्यालयीन कामाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत विकत घेता येईल.

७) खाली नमूद केल्याप्रमाणे दोन लिफाफे असलेला अर्हता निश्चितीचा निविदा संच मुख्य अभियंता यांचे कार्यालय, ५ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) येथे दि. २१/१२/२००९ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पोचतील अशा बेताने पाठवाव्यात.

लिफाफा १ :-
१) कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र, संयुक्त अभिकरणाचे करारपत्र.
२) कंत्राटदाराची पात्रता दर्शविणारे विवरणपत्र (संबंधित संदर्भ जोडावेत)

लिफाफा २ :-
१) उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री यांचे तपशील
२) प्रस्तावित मांडणी नकाशा
३) प्रकल्पाचे संकल्पन करणा-या पथकाचे तपशील (संरचनात्मक सल्लागार)
४) विहीत मुदतीत काम पूर्ण करण्यासाठी प्रस्तावित पद्धति.
५) कामाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या तंत्रज्ञांच्या पथकाचा तपशील.

८) निविदा पूर्व बैठक मुख्य अभियंता मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ५ वा मजला, वांद्रे - कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व) यांच्या कार्यालयात दि. ३०/११/२००९ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल.

९) फक्त अर्हताप्राप्त कंत्राटदारांकडून आर्थिक निविदा मागविण्यात येतील.

१०) अर्हता निश्चितीच्या निविदा उघडण्यासाठी अवलंब करावयाची पद्धत :-
१) अर्हता निविदा दि. २१/१२/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.
२) पात्र कंत्राटदारास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीपुढे प्रकल्पाचे सादरीकरण करावे लागेल. तांत्रिक निविदेचे मूल्यांकन खालील मुद्दयांवरुन करण्यात येईल.
अ) तांत्रिक प्रस्ताव
ब) कंत्राटदाराशी संलग्न असलेले संरचनात्मक/संकल्पनविषयक सल्लागार.
क) कामाचे नियोजन आणि पद्धति.
ड) कामाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणा-या तांत्रिक अधिकारी / कर्मचा-यांचा अनुभव.
इ) प्रस्तावाचा दृश्य व संरचनात्मक ढाचा.

११) अर्हता निश्चित करण्याची प्रक्रिया संपल्यानंतर १० दिवसाच्या आत आर्थिक निविदा सादर करणे आवश्यक आहे. आर्थिक निविदा फक्त - अर्हताप्राप्त कंत्राटदारांकडून मागविण्यात येतील, ज्याकरीता स्वतंत्र निविदा संच वितरित करण्यांत येईल.

१२) अधिक माहितीसाठी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा
प्रकल्प समंत्रक :- एस्. एन. भोबे अँन्ड असोसिएट्स प्रा. लि.
युनिट क्र. १०, बँकिंग कॉम्पलेक्स क्र. २,
सेक्टर १९ - ए, वाशी, नवी मुंबई
दूरध्वनी :- ०२२ - २७८३१०७०
फॅक्स :- ०२२ - २७८३११७३

१३) कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व अर्ज फेटाळण्याचा अधिकार प्राधिकरणाकडे आहे.

**टीप :- सन २००९ ची किंमत काढण्यासाठी ५% प्रतिवर्ष एवढी वाढ गृहीत धरण्यात येईल.**

दिनांक : १३/११/२००९
स्थळ : मुंबई
क्रमांक : अवि/वि..मुं.पा.सु.प्र./मनोरी/२००९

(श्री.र.नंदगींकर)
मुख्य अभियंता, अभियात्रिकी.विभाग